भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.६०१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०८/२०१७

**१) मुलीला अश्लिल शिवीगाळ करुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २६/०८/२०१७ चे १३.४५ वा ते १४.०० पर्यंत यातील फिर्यादीला आरोपीने तु मला बसची तिकीट दिली नाही असे म्हणुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन अंगावरील युनीफार्म ओढल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पो.स्टे. तुमसर येथे कलम ३५३,३५४(अ)(व्ही),२९४,५०९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाधव पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन बिना परवाना रॉयल्टीने रेती चोरीने चोरुन नेतांना व शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २६/०८/२०१७ २०.०० वा. दर. यातील फिर्यादी राजेश विश्वनाथ मडामे रा. तहसिल कार्यालय मोहाडी हे आपले स्टॉपसह रेती चोरी बाबत पेट्रेलींग करीत असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करुन आपले ताब्यातील ट्रक ५ ब्रास रेती किंमती ५२,०००/–रु. ची बिना रॉयल्टीने चोरी करुन नेतांनी मिळुन आले. वाहनाचा पंचनामा कारवाही करीत असतांना आरोपीतांनी दमदाटी करुन शासकीय कामात अडथळा निर्माण करुन वाहन बळजबरीने पळवुन नेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पो.स्टे. मोहाडी येथे कलम ३५३,३७९,१८६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन तलावामधुन मासेची चोरी. :–**

दिनांक २५/०८/२०१७ चे १९.०० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करुन मागासवर्गीय मत्सपालन संस्था मर्यादीत पचारा यांचे कडे ठेका असलेल्या फुटक्या तलावामध्ये चोरीने मासेमारी करुन अंदाजे दिड किलो मासे किंमती ३००/–रु. चे मिळुन आल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे ३७९, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कळंबे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक २५/०८/२०१७ चे २१.०० वा. दर. यातील फिर्यादी याने आपली हिरो होंडा स्पलेंन्डर मोटार सायकल क्र. एम एच ३१ सी वाय २८५९ किंमती २०,०००/–रु. ची एच. डी. एफ. सी. बॅक जवळ पार्कीग मध्ये ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी नितेश रामाजी चरडे वय २७ वर्ष, रा. घोटमुंढरी ता. मौदा जि. नागपुर याचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**५) अवैद्यरित्या बिना परवाना रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २६/०८/२०१७ चे १३.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये १ ब्रास रेती किंमती १५००/–रु. ची मरेगाव जुना चुलबंद नदीघाटातील अवैद्यरित्या बिना परवाना रेती उत्खन्न करुन चोरीने भरुन घेवुन जात असतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. शेंडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. सुनगार पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**६) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०८/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १६ वर्ष ११ महीने दिवस हीला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले असावे असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो. स्टे लाखनी हे करीत आहेत.

७) मोटार सायकलचा खड्डयामध्ये तोल जावुन डोक्याला मार लागुन उपचारा दरम्यान मृत्यु झाल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २७/०८/२०१७ ते ०४/०८/२०१७ पर्यत. यातील मृतक आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल निष्काळजीपने, हयगयीने चालवुन त्याचे खड्डया मध्ये तोल जावुन खाली पडुन डोक्याला गंभिर दुखापत झाल्याने उपचारा दरम्यान मेडीकल कॉलेज नागपुर येथे मरण पावल्याने पो. स्टे. वरठी येथे मर्ग क्र. १२/१७ कलम १७४ जाफौ. चे चौकशीत निष्पन्न झाल्याने पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रायपुरकर पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

८) अल्पवयीन मुलाला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २५/०८/२०१७ चे १३.०० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगा वय १७ वर्ष, १० महीने यास कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले असावे असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. टेभुर्णीकर पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

९) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :–

दिनांक २६/०८/२०१७ चे २१.०० वा. दर. यातील मृतक गोपाल सखाराम गराडे वय ४५ वर्ष, हल्लरदपुरी भंडारा याने पशु वैद्यकीय दवाखाना नेरी येथे स्वत: नॉयलॉन दोरीने सिलींग फॅन ला गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी महेश प्रल्हाद मंडीये वय २८ वर्ष, रा. बेला यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. हुकरे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

१०) महिलेचा सिजरींग होवुन उपचारा दरम्यान मृत्यु . :–

दिनांक २६/०८/२०१७ चे ०६.२० वा. दर. यातील मृतक सौ. रेश्मा देवानंद अंबुले वय २२ वर्ष, रा. चुन्हाड ही दिनांक २५/०८/२०१७ ला सा. रु. भंडारा येथील वार्ड क्र. ६ मध्ये डिलेव्हरी करीता भरती झाली असता तीचे सिजरींग होवुन उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. पठाण यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

१०) अवैध दारु/ जुगार अडयावर धाडी . :–

दिनांक २६/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, जवाहरनगर, करडी, वरठी, तुमसर, गोबरवाही, साकोली येथे दारू/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ११ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ११८ लिटर हातभटटी दारु+ग्लास+नगदी ७०० + ४ मोटार सायकल किंमती ४७,४८०/–रु. १ लिटर ७१० मिली लिटर देशी दारु किंमती ४५०/–रु. तसेच जुगारातुन किंमती ३,३०/–रु. असा एकुण किमती ४८,२६०/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २६/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली अवैध प्रवासी ०७ असून तीन सिटर वाहनांवरती १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ११९ केसेस करण्यात आलेल्या आहे.

पोलीस नियंत्रण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९४२३११५१८२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.